दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शुक्रवार दि.१७ एप्रिल २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २२८ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Friday 17 April 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 228 • Pages 4 • Rate 4 Rs

### वांद्रे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात नियोजन भवन इमारत

**मुंबई**–मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात बांधण्यात येणाऱ्या नियोजन भवन इमारतीचा भूमिपूजन सोहळा आज वांद्रे पूर्व येथे उत्साहात पार पडला. मुंबई उपनगरचे पालकमंत्री तसेच माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी विधिवत भूमिपूजन व कुदळ मारून या इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ केला.या भूमिपूजन सोहळ्यास आमदार संजय उपाध्याय, जिल्हाधिकारी सौरभ कटियार तसेच जिल्हा नियोजन अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. तत्पूर्वी सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जागेची पूजा अर्चना केली.बांद्रा (पूर्व) येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात नियोजन भवन उभारण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, जिल्हा नियोजन समितीच्या कामकाजासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र नियोजन भवन उभारण्याच्या सूचनेनुसार हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

# एसटीचा तोटा कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश

## सक्षम नेतृत्व देणे आवश्यक–परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) आर्थिक कामगिरीबाबत परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट भूमिका मांडत तोटा कमी करण्यासाठी सर्वंकष उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. ते एसटी महामंडळाच्या मुख्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत बोलत होते. या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.या आर्थिक वर्षात एसटीचे एकूण चालनीय उत्पन्न ११,४७५ कोटी रुपये इतके नोंदविण्यात आले, तर खर्च १२,०६६ कोटी रुपये झाला. परिणामी महामंडळाला ५९१ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला. दैनंदिन सरासरी उत्पन्न ३१ कोटी ४० लाख रुपये असताना, खर्च ३३ कोटी रुपये इतका झाला असून दररोज सुमारे १ कोटी ६० लाख



रुपयांचा तोटा होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

राज्यातील एकूण ३१ विभागांपैकी केवळ ८ विभाग नफ्यात असून, उर्वरित २३ विभाग तोट्यात आहेत. मागील आर्थिक वर्षात जालना, परभणी, बुलढाणा, भंडारा, गडचिरोली, अकोला, धुळे आणि वर्धा हे ८ विभाग नफ्यात होते. मात्र उर्वरित २३ विभागापैकी नाशिक, कोल्हापूर, नागपूर, रत्नागिरी, सातारा आणि ठाणे या मोठ्या विभागांचा वाढता तोटा गंभीर चिंतेचा विषय असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.येत्या आर्थिक वर्षात वाहतुकीचे सुयोग्य नियोजन करून उपलब्ध बसेस आणि मनुष्यबळाचा अधिकाधिक कार्यक्षम वापर करणे अत्यावश्यक आहे. उर्वरित दीड ते दोन कोटी रुपयांचा दैनंदिन तोटा भरून काढणे हे आपले मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे, असे ते म्हणाले. तोट्यातील विभागांची सखोल चौकशी करून त्यामागील कारणांची मिमांसा करावी व त्यावर ठोस उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच सातत्याने तोट्यात असलेल्या मोठ्या विभागांमध्ये सक्षम आणि कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### पर्यायी पदस्थापना देऊन सक्षम नेतृत्व देणे आवश्यक

**नागपूरसारख्या मोठ्या विभागात गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने तोटा होत असून तेथे अकार्यकारी विभाग नियंत्रक नेमण्यात आल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. ज्या अधिकाऱ्यांकडे आर्थिक आणि वैधानिक अधिकार नाहीत, ते प्रशासनावर प्रभावी नियंत्रण ठेवू शकत नाहीत. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांना पर्यायी पदस्थापना देऊन सक्षम नेतृत्व देणे आवश्यक आहे, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रशासनिक शिस्त, संसाधनांचा प्रभावी वापर आणि जबाबदारी निश्चिती या तत्त्वांवर भर देत लवकरच व्यापक सुधारणा आराखडा राबविण्यात येणार असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.**

## आ.अंतापूरकर यांचे प्रयत्न फळाला

# १०० खाटांचे दवाखाना बांधकामास निधि मंजूर

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर उपजिल्हा रुग्णालयाच्या १०० खाटांच्या श्रेणीवर्धन दवाखाना इमारतीच्या बांधकामासाठी २२ कोटी ९७ लक्ष निधी मंजूर झाल्याने तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम, आधुनिक आणि दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत.या कामासाठी आ.जितेश अंतापूरकर यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांची दखल घेत राज्याचे आरोग्यमंत्री मा. प्रकाशजी आबिटकर यांनी विशेष सहकार्य करत निधी मंजुरीसाठी पुढाकार



घेतला.दरम्यान, आ. अंतापूरकर यांनी मुंबई येथे आरोग्यमंत्री प्रकाशजी आबिटकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या निर्णयाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. यावेळी त्यांनी देगलूर तालुक्यातील आरोग्य सुविधांच्या उन्नतीसाठी आणखी सहकार्य करण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

१०० खाटांच्या अत्याधुनिक रुग्णालय इमारतीमुळे देगलूर आणि परिसरातील रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. स्थानिक स्तरावरच आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध होऊन आरोग्य व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे.

तालुक्याच्या विकासासाठी अशाच पद्धतीने विविध प्रकल्प राबविण्यासाठी आपण कटिबद्ध असून, जनतेच्या सहकार्याने विकासकामांना पुढेही गती देण्यात येईल, असा विश्वास आ.जितेश अंतापूरकर यांनी व्यक्त केला.

# सावित्रीबाई फुले शाळेत ओपन जिम उद्घाटन

## खा.डॉ.अजित गोपछडे यांच्या पुढाकाराने ओपन जीम–राजाराम काहाळेकर

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

नांदेड जिल्हातील राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या माध्यमातून सीएसआर निधीतून देगलूर शहरातील सावित्रीबाई फुले शाळेमध्ये ओपन जिम बसवण्यात आले. यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या ओपन जिममुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे शरीर सुदृढ व निरोगी राहिल व तसेच विद्यार्थ्यांना व्यायामाची सवय लागण्यास मदत होईल. शालेय विद्यार्थ्यांच्या स्वास्थ्यासाठी महत्वपूर्ण भूमिका घेऊन खा. गोपछडे यांनी ही ओपन जिम सावित्रीबाई फुले शाळेसाठी मंजुर करून दिल्यामुळे संस्थेच्या व कर्मचाऱ्याच्या तसेच सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.सदरील ओपन जिम चे उद्घाटन देगलूर- बिलोली मतदार संघाचे आमदार जितेश अंतापूरकर, लोकहीत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजाराम गजभारे काहाळेकर यांच्या हस्ते करण्यात




आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष लोकहित शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजाराम काहाळेकर,उदघाटक आमदार जितेश अंतापुरकर, प्रमुख पाहुणे शिवाजीराव देशमुख बळेगावकर, नगरसेवक सुमंत कांबळे, नगरसेविका पल्लवी द्याडे,नगरसेवक प्रतिनिधी नाना मोरे,सामाजिक कार्यकर्ते अशोक कांबळे यांच्या विशेष उपस्थितीसह लोकहित शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा मुख्याध्यापक यशवंतराव गजभारे,सचिव अँड.जयवंतराव गजभारे, सदस्या अनुसयाबाई गजभारे, सदस्य कंधारकर डी एस तसेच संत गाडगे महाराज संस्थेचे विश्वस्त संजय महाराज कीरजवळगेकर,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी हमीद दोलताबादी ,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालकवर्ग ,मातोश्री शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्री.प्रकाश वाघमारे निळेगव्हानकर आदी उपस्थितीत होते, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत अस्पतवार यांनी केले आभार विनोद पाटील यांनी मांडले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त 'समता ज्योत रॅली' उत्साहात संपन्न

## हाती समतेची ज्योत,ओठी जयभीमचा नारा

## माजलगावात शिव–फुले–शाहू–आंबेडकरी अनुयायी एकवटले

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त माजलगाव शहरात पोलीस प्रशासन आणि समस्त शिव - फुले - शाहू - आंबेडकर अनुयायी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली 'समता ज्योत रॅली' अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

संविधानाद्वारे समतेची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आणि समाजात समता, बंधुता व सामाजिक एकतेचा संदेश देण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार, १३ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११:३० वाजता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून या भव्य रॅलीला सुरुवात झाली.




हातात समतेची ज्योत घेऊन निघालेली ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथुन पुढे शहरातील प्रमुख मार्गावरून जात डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, भिमनगर येथे पोहोचली. येथे ठिक १२ वाजता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मान्यवरा सह जनतेने अभिवादन केले व बुद्ध वंदनेने ह्या रॅली ची सांगता करण्यात आली.

रॅली मध्ये बाबासाहेबांच्या विचारांचे फलक व निळे ध्वज दिसुन आले, ज्यामुळे संपूर्ण शहर चैतन्यमय झाले होते.

या समता ज्योत रॅली साठी मा.गौरव इंगोले उपविभागीय अधिकारी माजलगाव, मा.राहुल सुर्यतळ पोलीस निरीक्षक, माजलगाव यांच्या सह सर्व धर्मीय नेते, प्रतिष्ठीत नागरिक, नगरसेवक, व्यापारी, सर्व सामान्य नागरिक युवक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते महिला व युवतींचा मोठा सहभाग पहायला मिळला.

माजलगाव शहर व ग्रामीण परिसरातील समस्त शिव-फुले-शाहू-आंबेडकर अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान जय भीम च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवल्यामुळे रॅली अत्यंत शांततेत आणि शिस्तीत पार पडली.आयोजकांनी या कार्यक्रमाच्या यशाबद्दल सर्व सहभागी नागरिकांचे आणि प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# आपापल्या परिसरातील भोंदूंची तक्रारीसह माहिती दया–हनुमंत भोसले

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**


भोंदू अशोक खरात प्रकरणाने महाराष्ट्राचे डोळे उघडले आहेत. ज्योतिषी सारख्या थोतांड गोष्टीचा वापर करून एक अशिक्षित व्यक्ती स्वतःला उच्च शिक्षित समजणाऱ्या लोकांना आर्थिक, लैंगिक व मानसिक शोषण करून कसे सहज फसवतात हे जगाने पाहिले आहे. आज फक्त भोंदू अशोक खरात चर्चेत असला तरी या क्षेत्रात अध्यात्माचा आड पकडून यापेक्षाही मोठे भोंदू आज ही समाजात उजळ माथ्याने मिरवत आहेत. याशिवाय गाव, तालुका व जिल्हा पातळीवर असे अनेक छोटे मोठे भोंदू सक्रिय आहेत. हे लोक त्या त्या पातळीवर भोंदू अशोक खरात इतकेच समाजाला धोकेदायक आहेत. आपापल्या पातळीवर हे भोंदू लोक वरील सर्व प्रकारचे शोषण करत आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळी सारख्या संघटना व कार्यकर्ते अशा लोकांना समाजापुढे त्यांचे पितळ उघडे पाडतात तेंव्हा समाजातीलच कांही लोक त्यांचे समर्थन करून त्यांना संरक्षण देतात. त्यामुळे अशा लोकांवर कार्यवाही करणे अवघड जाते. अशा भोंदू चे भक्त ग्राहक शक्य तो गावाबाहेरचे ऐकीव माहितीवरून शक्यतो दूरच्या गावाहून आलेले असतात. अनेक ठिकाणी स्थानिक नागरिकांना याचा मोठा त्रास होतो. तरीही स्थानिक संबंधामुळे ते तक्रार करण्यासाठी पुढे येत नाहीत. अशा लोकांवर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी त्याचे नांव, पत्ता, भोंदूगिरीसाठी वापरत असलेल्या लिंबू, नारळ, मिरच्या, हळदी- कुंकू यासारखे साहित्य व ही कृती करतानाचा किमान एखादा व्हिडीओसह कोणीतरी तक्रार करणे गरजेचे आहे. वरील माहितीसह जर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे तक्रार केली तर समिती अशा लोकांवर पोलिसांच्या मदतीने तात्काळ कार्यवाही करू शकते अशी माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बीड जिल्हा अध्यक्ष हनुमंत भोसले यांनी केले आहे.



सध्या बीड जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील कांही गावात भोंदू अशोक खरात याच्याप्रमाणेच लोकांच्या समस्या सोडवण्याच्या नावाखाली त्या पातळीवर लैंगिक, आर्थिक व मानसिक शोषण करत असल्याची माहिती बीड जिल्हा अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे असून समिती या भोंदू लोकांवर लक्ष ठेवून आहे. आवश्यक ठिकाणी स्थानिक नागरिक व आजपर्यंत फसवणूक झालेल्या लोकांच्या तक्रार अर्ज मिळताच समिती त्यांच्यावर पोलीस कार्यवाही करणार आहे. यासाठी जनतेने ९४२३७३३८८८ या व्हाट्सअप क्रमांकावर माहिती व तक्रारी दाखल कराव्यात असे आवाहन ही महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष हनुमंत भोसले व कार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण यांनी केले आहे.

# संपादकीय

## चिंतेचे 'मोसमी' वारे



'एल निनो' घटक सक्रिय होण्याच्या शक्यतेमुळे यंदा महाराष्ट्रासह देशाच्या प्रमुख भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याचा हवामानशास्त्र विभागाचा अंदाज, हा शेतकऱ्यांसह धोरणकर्त्यांच्याही चिंतेत भर घालणारा आहे. यंदा सरासरीच्या ९२ टक्के इतकाच पाऊस होण्याचा विभागाचा प्राथमिक अंदाज आहे.गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे बसलेल्या फटक्यातून बहुतांश शेतकरी अजूनही सावरलेले नाहीत; अशा काळात येणाऱ्या मान्सूनने पाठ फिरवण्याने पुन्हा नव्या संकटाला सामोरे जाण्याची वेळ येऊ शकते.उत्तर भारतातील मोठ्या भागांत, विशेषत: गंगेचा मैदानी प्रदेश आणि पठारी भागात; तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्हे वगळता महाराष्ट्राच्या अन्य भागांमध्येही अपुरे पाऊसमान राहील, असे हा अंदाज सांगतो. मान्सूनच्या काळात या पावसाचे वितरण कसे राहील; म्हणजेच कोणत्या काळात आणि कोणत्या भागांत किती पाऊस होईल, याबाबत पुढील महिन्यात जाहीर होणाऱ्या अंदाजात नेमके चित्र समोर येईल; मात्र शेतकरी आणि प्रशासनालाही संभाव्य संकटाचा मुकाबला करण्यासाठी सज्ज राहण्याचा इशारा या प्राथमिक अंदाजाने दिला आहे.आजही देशातील सुमारे साठ टक्के शेती पावसावरच अवलंबून आहे. गेल्या तीन वर्षांचा विचार करता, सन २०२३मध्ये पाऊसमान कमी राहिले. सन २०२४ मध्ये जास्त पाऊस झाला आणि गेल्या वर्षी तर अतिवृष्टीने शेतकऱ्यांची दाणादाण उडवून दिली. त्या पार्श्वभूमीवर यंदा पाऊस सरासरी गाठणार नाही, असा अंदाज आहे. जून ते सप्टेंबर या मान्सूनच्या महिन्यांत हा घटक सक्रिय होणार आहे. पाऊस वेळेत न आल्यास दुबार पेरण्यांची वेळ येऊ शकते किंवा नंतर त्याने ओढ दिल्यास वाढीच्या काळातच पिकांना त्याचा फटका बसू शकतो. परिणामी भात, ज्वारी-बाजरी, कापूस, सोयाबीन, वेगवेगळ्या डाळी आणि तेलबियांसारख्या पिकांच्या उत्पादनात घट होऊ शकते.सध्या राज्यभरात तीव्र उन्हाळा जाणवत असून येत्या काही काळात मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेचे इशारे देण्यात आले आहेत. अशा काळात जमिनीतील ओल निघून जाते आणि जलसाठ्यांमधील पाण्याच्या बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढते. त्या पार्श्वभूमीवर पाऊसही अपुरा होणे शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरणार आहे. गेल्या वर्षी राज्याच्या अनेक भागांमध्ये अतिवृष्टीने पिके हातून गेली; तसेच जमिनींचा सुपीक थरही खरवडून गेल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये आधीच शेतकरी हैराण आहेत. त्यात अपुऱ्या पावसाने आणखी काय अडचणी उभ्या राहणार, याची नवी चिंता उभी राहिली आहे. यासाठी स्वत: शेतकरी आणि प्रशासनानेही आताच योग्य नियोजन करण्याची गरज आहे.दुष्काळ-अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तींबरोबरच मानवनिर्मित संकटांचा बळी हा शेतकरीच ठरतो, हा दैवदुर्विलास आहे. सध्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धस्थितीमुळे सारे जग होरपळत आहे. भारतातही गॅसटंचाईबरोबरच इंधनाची संभाव्य टंचाई आणि खतांच्या तुटवड्याचे संकट भेडसावत आहे. आपल्याकडे प्रामुख्याने रशिया व चीनसह सौदी अरेबिया, ओमान, कतार आणि संयुक्त अरब अमिरातींमधून खतांची आयात होते. 'होर्मुझ'च्या सामुद्रधुनीतील वाहतूक बंद असल्याने मध्यपूर्वेतून खतांचा पुरवठा विस्कळित झाला आहे, त्यावर तातडीने पर्याय शोधावा लागेल आणि खतांची भेसळ व काळा बाजारही रोखावा लागेल. त्याबरोबरच कमी पावसावर तग धरणाऱ्या पिकांचाही विचार करावा लागेल. उपलब्ध जलसाठ्यांचे योग्य नियोजन, जलसंधारण आणि पाण्याचा फेरवापर यासाठी धोरणे आखून त्याची कडक अंमलबजावणी करावी लागेल; तसेच ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाचेही नवे तंत्रज्ञान वाजवी दरांत शेतकऱ्यांना पुरवावे लागेल.या युद्धस्थितीमुळे आंबे, द्राक्षे यांसह मोठ्या शेतीमालाची निर्यातही रखडल्यामुळे राज्यातील अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यातच खते-कीटनाशके आणि मजुरीच्या दरांत मोठी वाढ झाल्याने शेतमालाचा उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे; त्या तुलनेत मालाला दर मिळत नसल्याने शेती आतबट्ट्याची ठरत आहे. या मालिकेत आणखी नवे संकट शेतकरीच नव्हे, तर साऱ्या अर्थव्यवस्थेला झेपणारे नाही. गेला काही काळ नियंत्रणात असलेल्या महागाईमध्ये गेल्या महिन्यांत युद्धस्थितीने काहीशी वाढ झाली. कमी-अधिक पावसाचे निसर्गचक्र रोखता येत नसले, तरी यंत्रणा सज्ज ठेवून संकटाला सामोरे जाण्याचे नियोजन नक्कीच करता येते. सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज लक्षात घेऊन आपत्कालीन नियोजनाची आतापासूनच तयारी करायला हवी.

# खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल्सला प्रगत स्ट्रोक केअर सेवांसाठी QAI कडून मिळाली मान्यता

## उच्च दर्जाच्या स्ट्रोक उपचार सेवांसाठी हॉस्पिटलने गाठला महत्त्वपूर्ण टप्पा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल्सला त्यांच्या अ‍ॅडव्हान्स्ड स्ट्रोक सेंटरसाठी क्वालिटी अँड अ‍ॅक्रेडिटेशन इन्स्टिट्यूट (QAI) कडून मान्यता प्राप्त झाली असून हे नवी मुंबईतील पहिले 'अ‍ॅडव्हान्स्ड स्ट्रोक सेंटर' ठरले आहे. ही मान्यता मिळाल्याने उच्च दर्जाच्या स्ट्रोक उपचार सेवांसाठी हॉस्पिटलने महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. या हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय निकषांनुसार प्रगत स्ट्रोक केअर सेवा पुरविली जाते. वेळीच निदान, प्रगत इमेजिंग तंत्रज्ञान, उत्तम स्ट्रोक युनिट आणि विविध तज्ज्ञांच्या समन्वयातून काम करणारी मल्टिडिसिप्लिनरी टीमचा समावेश असलेली मजबूत यंत्रणा या हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहे. यामुळे हॉस्पिटल अत्यंत गुंतागुंतीच्या स्ट्रोक प्रकरणांनाही आपल्या कार्यक्षमतेने यशस्वीपणे हाताळू शकते, ज्यामुळे जलद निर्णयप्रक्रिया, उपचार आणि सुधारित परिणाम साध्य होतात. डॉ. पवन ओझा( संचालक - न्यूरोसायन्स) म्हणाले, स्ट्रोक हा मेंदूमध्ये ब्लॉकेजेस किंवा रक्तस्रावामुळे उद्भवतो. यामध्ये अचानक अशक्तपणा, बोलण्यात अडचणी जसे की अचानक बोलणं थांबणं आणि काही काळ बोलता न येणं किंवा चेहरा वाकडा होणे अशी लक्षणे दिसतात. योग्य वेळी उपचार न मिळाल्यास आयुष्यभरासाठी अपंगत्व, पक्षाघात, बोलताना अडचणी येणे, स्मरणशक्ती किंवा आकलन विषयक समस्या निर्माण होऊ शकतात. स्ट्रोक व्यवस्थापनासाठी अत्यंत समन्वयित पद्धत आवश्यक असते आणि वेळ हा यामध्ये सर्वात महत्त्वाचा घटक असतो. मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये आम्ही एक सर्वसमावेशक अ‍ॅक्युट स्ट्रोक केअर पाथवे तयार केला आहे, ज्यामुळे रुग्ण हॉस्पिटलमध्ये आल्याक्षणीच त्यांना तत्काळ उपचार मिळतात. प्रगत इमेजिंगद्वारे जलद निदानापासून ते वेळेवर औषधोपचार आणि न्यूरो-इंटरव्हेन्शनल उपचारांपर्यंत प्रत्येक टप्पा मेंदूचे नुकसान कमी करण्यासाठी आणि रुग्णाच्या पुनर्प्राप्तीला गती देण्यासाठी आखण्यात आला आहे. क्वालिटी अँड अ‍ॅक्रेडिटेशन इन्स्टिट्यूट (QAI) ही आरोग्यसेवा संस्थांना उच्च दर्जाचे निकष पूर्ण केल्याबद्दल प्रमाणित करणारी सर्वोच्च संस्था आहे. मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या स्ट्रोक केअर सेवांना मिळालेली ही मान्यता त्यांच्या उत्तम, कार्यक्षम आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रणालीचे प्रतीक आहे. डॉ ओझा पुढे सांगतात की, स्ट्रोक केअर केवळ आपत्कालीन उपचारांपुरती मर्यादित नसून ती पोस्ट-स्ट्रोक रिहॅबिलिटेशनपर्यंत विस्तारलेले आहे, ज्याचा उद्देश दीर्घकालीन पुनर्प्राप्ती साध्य करणे हा असतो. आम्ही वेळीच उपचार, रुग्णांमध्ये जनजागृती, सक्षमीकरण आणि न्यूरो-रिहॅबिलिटेशन सपोर्ट यावर भर देतो, जेणेकरून स्ट्रोकग्रस्त रुग्णांना पुन्हा स्वावलंबी होता येते. डॉ. हरीश नाईक(न्यूरोसर्जन, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबई ) म्हणाले, स्ट्रोक ही एक वैद्यकीय आणीबाणी आहे, ज्यामध्ये प्रत्येक सेकंद महत्त्वाचा ठरतो. योग्य वेळी उपचार मिळाल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो, अन्यथा आयुष्यभरासाठी अपंगत्व येऊ शकते. संदीप जोशी (केंद्र प्रमुख - मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबई) म्हणाले, या मान्यतेमुळे हॉस्पिटलने नवी मुंबई आणि आसपासच्या भागात प्रगत स्ट्रोक केअर सेवांसाठी विश्वासार्ह केंद्र म्हणून आपले स्थान आणखी बळकट केले आहे.

# रत्नबोधी विहारातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जल्लोषात मिरवणूक

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



विक्रोळी (पूर्व)कन्नमवार नगर येथील बौद्धजन सेवा संघाच्या रत्नबोधी विहारातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक कन्नमवार नगरातून काढण्यात आली.रत्नबोधी विहाराची नुकतीच नवीन कार्यकारिणी जाहीर झाली आहे.त्यामुळे ही त्यांची पहिली डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती आहे.त्यामुळे नवीनकार्यकारिणीने मोठ्या उत्साहात त्याचे आयोजन केले होते.यामध्ये अध्यक्ष प्रवीण भागवत केदारे, उपाध्यक्ष दिपक शंकर पगारे, उपाध्यक्षा निर्मला गंगाधर गवळी सरचिटणीस जगदीश मधुकर गवारे, चिटणीस आनंद शंकर घोक्षे आणि सुवर्णा रघुनाथ टिळक,खजिनदार भूपेंद्र प्रकाश हिरे उपखजिनदार राजेश राणोजी साळवे सदस्य म्हणून अरविंद हरिभाऊ जाधव, वैभव माधवराव झेंडे आणि विशाल सोपान कांबळे यांचा समावेश होता.चौकाचौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले.कन्नमवार नगरात बॅनर पोस्टर्सने निळा जनसागर ओसंडून वहात होता.भिम सैनिक व भिम कन्या गाण्याच्या तालावर बेफाम होऊन नाचत होते.या मिरवणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगरसेविका सुनिता जाधव चंद्रशेखर,उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव, विधानसभा उपविभाग वंदना बेंद्रे, शाखाप्रमुख अभय राणे,शाखा संघटिका आसावरी भोईटे यांनी भिम सैनिक व भिम कन्या यांचे स्वागत केले.




ठाणे ; ठाण्यातएन के टी हॉल येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने १३५ वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, समाजरत्न नानजीभाई ठक्कर (ठाणावाला), एन के टी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप पाटील, माळशेज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष हभप. चंद्रकांत महाराज डुंबरे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे सचिव संतोष पडवळ, पत्रकार भीमराव शिरसाठ, पत्रकार नरेश म्हाडसे आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना नानजीभाई म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे उच्च शिक्षण घ्या, नीतीने वागा, चांगले यश आणि वेळ तुमच्या आयुष्यात आल्याशिवाय राहणार नाही.

# रेवदंड्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त रेवदंडा येथील पंचशील युवक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने उत्साहपूर्ण व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचविण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ज्ञान हेच माणसाचे खरे शस्त्र आहे आणि संविधान हे केवळ कागदावरचे लिखाण नसून ते सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे या बाबासाहेबांच्या विचारांचा उल्लेख करत उपस्थितांनी त्यांना अभिवादन केले.यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे हे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात बाबासाहेबांचे विचार आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ असल्याचे सांगत, सामाजिक समता, न्याय, बंधुता आणि शिक्षणाच्या माध्यमातूनच समाज प्रगती करू शकतो, असे प्रतिपादन केले.या प्रसंगी रेवदंडा ग्रामपंचायत सरपंच प्रफुल मोरे, सदस्य संतोष मोरे, माजी सदस्य सुरेश खोत, सदस्य संदीप खोत, निलेश खोत, सुराराम माळी, खलील तांडेल, अशोक नाईक, सुहास घोणे, इक्बाल फटाकरे, आसिफ गोंडेकर, हर्षल घरत, शरद वरसोलकर, सरोज वरसोलकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पंचशील युवक मंडळाचे अध्यक्ष मधुकर गायकवाड, उपाध्यक्ष नितीन गायकवाड तसेच सदस्य सचिन पवार, सागर गायकवाड, गौरव गायकवाड, सतीश पवार, अमोल गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाजात समानता, स्वाभिमान आणि प्रगतीचा मार्ग अवलंबण्याचा संदेश देण्यात आला.

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांना वंदन; विधानभवनात उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांचे अभिवादन

## नारी शक्ती विधेयकाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या महिलांची एकत्रित येऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधानभवन, मुंबई येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी बोलताना त्यांनी बाबासाहेबांच्या समता, न्याय आणि बंधुत्वाच्या विचारांना अधिक बळ देण्याची गरज अधोरेखित करत नो वन शुड बी लेफ्ट बिहाइंड या तत्वावर आधारित सर्वसमावेशक विकासाचा संकल्प व्यक्त केला. राज्यघटनेच्या चौकटीत राहून लोकशाही मूल्यांचे संरक्षण करत सुशासन देण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमाला विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे, विलास आठवले, शिवदर्शन साठे, जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने, उपसभापतींचे खासगी सचिव अविनाश रणखांब, सभापतींचे खासगी सचिव पंडित खेडकर यांसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच नारी शक्ती विधेयकाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या महिलांनी एकत्र येत बाबासाहेबांना आदरांजली वाहिली. यामध्ये उपनेत्या कला ताई शिंदे, कीर्ती मेश्राम (मुंबई उपनगर), सुनीताताई मोरे (सांगली), संगीता चव्हाण (बीड), रिंकू मोरे (पुणे), शालिनी सुर्वे, कमल कन्नल, वर्षा मोरे (ठाणे), भक्ती भोसले (मुंबई), रेखा मोरे आदींचा सहभाग होता.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचा प्रचार व प्रसार करु या; स्नेहल कांबळे यांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचा प्रचार व प्रसार करु या, असे आवाहन संविधान प्रचारक कार्यकर्त्या स्नेहल कांबळे यांनी केले. विक्रोळी कन्नमवार नगर येथील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्नेहल कांबळे बोलत होत्या. मंडळाचे सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्र शासन सन्मानित ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास मंडळाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर, माजी अध्यक्ष विनायक पेवेकर, सल्लागार वासुदेव कदम, चित्रोळीकार मुकुंद कुलकर्णी, सी. के. सर्वगोड,बबन देशनेहरे आदि मान्यवर उपस्थित होते. स्नेहल कांबळे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. माता रमाई शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर अपूर्ण होते. स्वत:ची चार मुले दगावली असताना रमाईने डॉ. बाबासाहेब आंबेडकर परदेशात असताना स्वत: हाल अपेष्टा सहन करीत त्यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही, ते ज्ञानाचे महासागर, बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांनी समाजाला प्रवाहात आणले आहे. त्यांनी दिलेल्या समानतेसाठी प्रयत्न केले पाहिजेत. डॉ. बाबासाहेबांकडे ११ भाषा व ३२ पदव्या होत्या. त्यांनी दिलेले संविधान जगात श्रेष्ठ आहे, असे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भिमजयंती २०० देशात साजरी होते असे स्नेहल कांबळे यांनी अधोरेखित केले. जगात महिलांना मतदानासाठी झगडावे लागले. परंतु आपल्या देशात डॉ. बाबासाहेबांनी महिलांना मतदानाचा अधिकार संविधानात दिला आहे, याकडे कांबळे यांनी लक्ष वेधले. पुणे स्टेशन जवळील साडे तीन एकरात माता रमाईचे स्मारक आहे. त्याठिकाणी आपण ज्येष्ठ नागरिकांनी भेट द्यावी, असे स्नेहल कांबळे विनम्र पणे म्हणाल्या. प्रारंभी प्रभात मित्र मंडळाच्या गायकांनी प्रभात समयी भिम गीते गाऊन वातावरण प्रफुल्लित केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे उपाध्यक्ष निवृत्ती मस्के, उपसचिव श्रध्दानंद निकम, भूमय्या सोमा, विलास देशनेहरे, हरिश्चंद्र गावकर, बबन माने, पोपट साठे आदिंनी परिश्रम घेतले.

# केंद्र पुरस्कृत योजनांचा खासदारांकडून आढावा

## जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची (दिशा) बैठक

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



केंद्र शासनाच्या वतीने जिल्ह्यात सुरू असलेल्या योजनांच्या प्रगतीचा लेखाजोखा घेण्यासाठी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीचा (दिशा) आढावा आज (दि. १५) घेण्यात आला.नियोजन भवन येथे पार पडलेल्या या बैठकीला चंद्रपूर शहराच्या महापौर संगिता खांडेकर, आमदार देवराव भोंगळे, जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षीरसागर, जिल्ह्यातील नगराध्यक्ष, दिशा समितीचे अशासकीय सदस्य व विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

जिल्ह्यात बांधकामाधीन असलेल्या राष्ट्रीय महामार्गालगत सर्व्हिस रोडचे बांधकाम करणे आवश्यक आहे, जेणेकरून शेतक-यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी सोयीचे होईल, मात्र काही ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने सर्व्हिस रोडचे बांधकाम केले नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत महामार्ग प्राधिकरणने संबंधित कंत्राटदारास सक्त निर्देश देऊन सर्व्हिस रोडचे बांधकाम करून घ्यावे. ज्या भागात बीएसएनएलचे टॉवर बंद / रेंज नसेल तेथे अधिका-यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी. प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील रस्ते आवश्यक गावात प्राधान्याने पूर्ण करावे. अंगणवाडीतून दर्जेदार पोषण आहार दिला गेला पाहिजे. अन्यथा नागरिकांना कुठे तक्रारी करावयाच्या याबाबत प्रत्येक अंगणवाडीमध्ये फलक लावावा.

वर्धा – बल्लारशहा रेल्वेच्या तिसरी लाईन संदर्भात स्थानिक यंत्रणेला विश्वासात घ्यावे. गावागावांमधील शेत पाणंद रस्ते अतिशय महत्वाचा विषय आहे, ते त्वरीत पूर्ण करावे. चंद्रपूर शहराची लोकसंख्या लक्षात घेता महानगर पालिकेने पाणी पुरवठा योजनेचे योग्य नियोजन करावे. अमृत योजनेचे अतिशय संथगतीने आणि निकृष्ट काम करणा-या संबंधित कंत्राटदारावर मनपाने कारवाई करावी. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने स्कूल बसेसची फिटनेस तपासणी करावी. तसेच रस्त्याच्या बाजुला उभ्या असणा-या वाहनांवर सक्त कारवाई करावी. खाजगी शाळांमध्ये कोणत्याही शालेय साहित्याची विक्री नको. जी शाळा जबरदस्ती करीत असेल अशा संस्थांवर शिक्षण विभागाने कारवाई करावी, अशा सुचना खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिल्या.यावेळी आमदार देवराव भोंगळे, विविध नगर पालिकेचे नगराध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी अधिकाऱ्यांना सुचना केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षीरसागर यांनी तर संचालन जि.प. समाजकल्याण अधिकारी धनंजय साळवे यांनी केले.या विषयांचा झाला आढावा : यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, बीएसएनएल – भारत नेट, प्रधानमंत्री खनीज क्षेत्र कल्याण योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, ग्रामीण आणि शहरी प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत मिशन (शहरी आणि ग्रामीण), अमृत योजना, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री कृषी विमा योजना, मृदा आरोग्य कार्ड, राष्ट्रीय आरोग्य मिशन, सर्व शिक्षा अभियान, एकात्मिक बालविकास योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजनेचा आढावा घेतला.

## आकार प्रतिष्ठानचा उपक्रम सन्मानासोबत साहित्याचा उत्सव; आपलं कोंकण पुस्तकाचे ३० एप्रिलला प्रकाशन

दैनिक वादळ वार्ता

**रायगड । प्रतिनिधी**



आकार प्रतिष्ठान, पोलादपूर यांच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व गुणगौरव सोहळ्यात यंदा साहित्यिक रंग अधिक खुलणार असून, प्रतिष्ठानचे विश्वस्त व माजी मुख्याध्यापक अजितकुमार विश्वास जंगम यांच्या आपलं कोंकण या पुस्तकाचे ३० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी कापडे बुद्रुक येथे प्रकाशन करण्यात येणार आहे.या सोहळ्यास कोंकणातील अनेक साहित्यिक, कवी व साहित्यप्रेमी उपस्थित राहणार असल्याने कार्यक्रमाला विशेष साहित्यिक महत्त्व प्राप्त होणार आहे. आपलं कोंकण या पुस्तकामध्ये कोंकणातील ग्रामीण जीवन, निसर्ग, संस्कृती, परंपरा आणि स्थानिकांच्या भावविश्वाचे जिवंत चित्रण करण्यात आले आहे.

कार्यक्रमात पुस्तक प्रकाशनासोबतच विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा गुणगौरव, गुणिजनांचा सन्मान तसेच माजी शिक्षकांचा आदर-सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रम, ऑर्केस्ट्रा आणि स्नेहसंमेलनाचे आयोजनही करण्यात आले आहे.साहित्य, सन्मान आणि संस्कृती यांचा सुंदर संगम घडविणारा हा सोहळा पोलादपूर तालुक्यातील संस्मरणीय कार्यक्रम ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.अशी माहिती आकार प्रतिष्ठान, पोलादपूरचे अध्यक्ष अजय सलागरे यांनी दिली आहे.

## श्रीमती उज्ज्वला चंदनशिव यांना ‘शिवरत्न भूषण’ पुरस्कार; समाजकार्याची दखल

दैनिक वादळ वार्ता

**रायगड । प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात समाजसेवेचे व्रत जोपासणाऱ्या समाजसेविका श्रीमती उज्ज्वला भालचंद्र चंदनशिव यांना सामाजिक क्षेत्र शिवरत्न भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिवप्रेमी सामाजिक संस्था, लोणारे यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात १२ एप्रिल २०२६ रोजी सुप्रसिद्ध गायक अवधूत गुप्ते तसेच अमरावतीचे उपजिल्हाधिकारी सचिन शेजाळ यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.श्रीमती चंदनशिव यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी सातत्यपूर्ण आणि प्रभावी कार्य केले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना स्वावलंबनाचा मार्ग मिळाला असून समाजात सकारात्मक परिवर्तन घडताना दिसत आहे.त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम यशस्वीपणे राबवले जात आहेत. यामध्ये २४ तास सेवा देणारा ‘उज्ज्वल दवाखाना’, महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, ‘सहजानंद आध्यात्मिक गोपाळ निवास’ वृद्धाश्रम, तसेच पेशंट केअर सेवा यांचा समावेश आहे. या उपक्रमांमुळे समाजातील गरजू घटकांना मोठा आधार मिळत आहे.या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून, त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.यावेळी अवधूत गुप्ते यांनी पुरस्कारामुळे सामाजिक कार्याला अधिक प्रेरणा मिळते, असे मत व्यक्त केले. तर सचिन शेजाळ यांनी महिलांच्या भरीव योगदानाचे कौतुक करत पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले. आयोजक रोहित पाटील यांनी ‘शिवशंभू गाथा’ सादर करत उपस्थितांचे मनोरंजन केले.उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था, अलिबाग तसेच माणुसकी प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून सिग्नल स्कूल, वृद्धाश्रम, होम नर्सिंग सेवा, २४ तास आरोग्य सेवा, प्राणीमात्र सेवा, गोशाळा आणि नाममात्र दरात व्यवसाय प्रशिक्षण यांसारखे विविध उपक्रम राबवले जात आहेत.

## शिक्षक आमदारांच्या उपस्थितीत नवभारत विद्यालयात आंबेडकर जयंती उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**मूल । प्रतिनिधी**




नवभारत विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, मूल येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शिक्षक आमदार सुधाकरराव अडबाले यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिक्षक आमदार सुधाकरराव अडबाले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच मुख्याध्यापक तथा प्राचार्य छत्रपती बारसागडे यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमाला प्रा. महेश पानसे, प्रा. किसन वासाडे, ज्येष्ठ शिक्षक गुरुदास चौधरी, सुपरवायझर वर्षा भांडारकर, प्रा. पुस्तोडे, प्रा. विजय काटकर, प्रा. संजय येरोजवार, प्रा. प्रभाकर धोटे, शिक्षक राजू बोढे, निलेश माथनकर, उदय चौधरी, सलाम, पुप्पलवार, निखाडे, तसेच उमक, तलांडे यांच्यासह नवभारत विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. याच प्रसंगी नवभारत कन्या विद्यालयात आमदार निधीतून प्राप्त वॉटर फिल्टरचे उद्घाटनही आमदार सुधाकरराव अडबाले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला शिक्षण प्रसार मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल वैरागडे, सचिव शशिकांत धर्माधिकारी, मुख्याध्यापिका, शिक्षकवर्ग व विद्यार्थीनी उपस्थित होत्या. आपल्या मार्गदर्शनात आमदार अडबाले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे आचरण करण्याचे तसेच संविधानाचा आदर राखण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्राचार्य छत्रपती बारसागडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## काटेगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**काटेगाव । प्रतिनिधी**



काटेगाव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरी करण्यात आली. गावातील सर्व समाजघटकांनी एकत्र येत या उत्सवात सहभाग नोंदवून अभिवादन केले.जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत शिक्षण, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात विविध मान्यवरांनी आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या जीवनकार्याचा आढावा घेत वंचित घटकांसाठी केलेल्या कार्याची माहिती देत उपस्थितांना प्रेरित केले. त्यांच्या विचारांवर चालत समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमादरम्यान सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला असून, सर्व समाजघटक एकत्र येऊन जयंती साजरी करत असल्याने गावात एकात्मतेचे सुंदर चित्र पाहायला मिळाले.

कार्यक्रमाला गावातील प्रमुख नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक व युवक मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ग्रामस्थ व आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.एकूणच, काटेगाव येथे साजरी करण्यात आलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ही उत्साह, एकता आणि सामाजिक जागृतीचा संदेश देणारी ठरली.

## मरेगाव आश्रम शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




दैनिक वादळ वार्ता

**मुल । प्रतिनिधी**

शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, मरेगाव येथे १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक बिसेन सर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून अधीक्षक रंगारी सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश जयारपवार सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन शीतल शीडाम यांनी मानले. यावेळी मेश्राम , परिचारिका तोटावर तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत आपले मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक बिसेन यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व सांगत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, समानता आणि प्रगतीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले.

## ब्रम्हपुरी मतदारसंघातील प्रत्येक गावात वाचनालय उभे करणार

## विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते,आमदार विजय वडेट्टीवार यांचे प्रतिपादन

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त २६ गावांतील वाचनालयांना ३९ लाखांच्या पुस्तकांचे वितरण समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवायचे असेल तर त्याची सुरुवात पुस्तकांपासून झाली पाहिजे. विचारांची क्रांती ही वाचनातूनच घडते. त्यामुळे ब्रम्हपुरी मतदारसंघातील प्रत्येक गावात सुसज्ज सार्वजनिक वाचनालय उभे करण्याचा माझा संकल्प आहे, असे प्रतिपादन विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक आमदार विकास निधीतून ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रातील २६ गावांतील सार्वजनिक वाचनालयांना तब्बल ३९ लाख रुपयांच्या निधीतून स्पर्धा परीक्षा व विविध साहित्यिक पुस्तके मंजूर करून त्यांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमास माजी प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे, माजी प्राचार्य डॉ. एन. एस. कोकोडे, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष हितेंद्र राऊत, नगराध्यक्ष योगेश मिसार, नगरपरिषद उपाध्यक्ष डॉ. नितीन ऊराडे, कृउबा सभापती प्रभाकर सेलोकर, माजी जि.प. सदस्य डॉ. राजेश कांबळे, माजी जि.प. सदस्य प्रमोद चिमुरकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी तसेच विविध गावांतील वाचनालय प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मंत्र दिला. त्या मंत्राची अंमलबजावणी करण्यासाठी गावोगावी ज्ञानाची केंद्रे उभी राहणे आवश्यक आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावीत, त्यांना स्पर्धा परीक्षांसाठी योग्य मार्गदर्शन मिळावे, हा या उपक्रमामागील हेतू आहे.

ते पुढे म्हणाले, महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजातील वंचित, शोषित आणि स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी केलेले शैक्षणिक कार्य अतुलनीय आहे. त्यामुळे महाराष्ट्रात त्यांच्या जयंतीचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात यावा, अशी मागणी मी विधीमंडळात करणार आहे. तसेच, गावात वाचनालय असेल तर युवकांचे भविष्य उज्ज्वल होते, विद्यार्थ्यांना दिशा मिळते आणि समाजात सकारात्मक विचारांची पेरणी होते. म्हणूनच पुढील काळात मतदारसंघातील प्रत्येक गावात आधुनिक वाचनालय निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करणार आहोत, असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी बोलताना माजी प्राचार्य डॉ.कोकोडे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हा निधी अत्यंत उपयुक्त ठरणार असून अनेक युवकांना याचा थेट लाभ होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे ज्ञान, शिक्षण आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश मतदारसंघभर पोहोचला असून गावोगावी वाचन संस्कृती रुजण्यास नवी चालना मिळणार आहे असे म्हणाले.

तर बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून पुस्तक वितरण कार्यक्रम ठेवण्यात आला ही या महापुरुषांना खरी आदरांजली आहे असे मार्गदर्शन डॉ.राजेश कांबळे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल मैंद यांनी तर प्रास्ताविक ग्रंथालय अधिकारी यांनी केले.

# केज येथे शुक्रवारी केज विकास संघर्ष समितीचा रस्ता रोको आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

तहसीलदार राकेश गिड्डे यांचा अपघातीय मृत्यू, कानडी रस्ता दुरुस्ती व लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृहाचे बांधकाम वेळेत व उत्कृष्ठ दर्जाचे व्हावे या तीन प्रमुख मागण्यासाठी केज विकास संघर्ष समितीच्या वतीने शुक्रवारी सकाळी अकरा वाजता केज तहसील कार्यालयासमोर महामार्गांवर रस्ता रोको आंदोलन करणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिली आहे.

केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचा ९ एप्रिल रोजी लातूरच्या रेणापूर नजीक कार अपघातात मृत्यू झाला होता. मात्र घटनास्थळी गाडीचे दोन्ही दरवाजे बंद असतांना त्यांचा मृतदेह बाहेर कसा आला? त्यांचा मोबाईल, लॅपटॉप सह इतर महत्वाचे साहित्य नेमके कुठे आहे? तहसीलदार पदावर असणाऱ्या इतक्या महत्वाच्या व्यक्तीच्या बाबतीत पोलीस तात्काळ व योग्य तपास का करत नाहीत? टोलनाका पार केल्यानंतर अपघात होईपर्यंत च्या काळात तहसीलदार कोठे होते व त्यांच्यासोबत कोण लोक होते असे अनेक प्रश्न उपस्थित होत असल्याने या अपघाताची पोलीस प्रशासन व वरिष्ठ पातळीवरून सखोल चौकशी करून जनतेच्या मनातील शंका प्रशासनाने दूर कराव्यात अशी मागणी समितीने केली आहे.

याशिवाय शहरातील कानडी रोडचे दोन्ही बाजूने पंखा भरण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे अर्धवट राहिले आहे. यामुळे या भागातील नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. वारंवार लेखी व तोंडी सूचना व निवेदने देऊनही हे काम पूर्ण केले जातं नाही. हे काम तातडीने दोन दिवसात पूर्ण करावे.तसेच केज शहरातील लोकनेते गोपीनाथराव मुंडे सांस्कृतिक भवन नाट्यगृहाचे काम गेली एक वर्षांपासून सुरु आहे. हे काम सुरुवातीला चांगले केले गेले मात्र नंतर हे काम मंदगतीने व कांही ठिकाणी निकृष्ठ होत असल्याचे दिसत आहे. हे काम येत्या १५ ऑगस्ट पूर्वी पूर्ण करून ते केज नगरपंच्यायत कडे हस्तान्तरीत करावे अशी मागणी समितीने केली आहे.

वरील तीन मागण्यासाठी हे आंदोलन केले जाणार असून या आंदोलनात केजच्या जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. निवेदनावर हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, इंजि. कराड, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# दत्त सेवक गोकुळ उगले यांच्या माध्यमातून सासुरा येथे साकारत आहे भव्य दिव्य श्री दत्त मंदिर

## अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर अनेक मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजनाचा सोहळा

दैनिक वादळ वार्ता
**महादेव दळवे । केज**

तालुक्यातील सासुरा येथील दत्तसेवक गोकुळ रामराव उगले यांच्या सासुरा येथील शेतात साधुसंत, संन्यासी, विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर दि. १९-४-२६ रोजी सकाळी ९-३० वाजता श्री गुरुदत्त मंदिराच्या उभारणीचे भूमिपूजन तसेच सभागृहाचे लोकार्पण होणार आहे.

सासुरा येथील गोकुळ उगले हे मागील अनेक वर्ष पोलीस खात्यात आपले कर्तव्य बजावत आहेत. ते व त्यांचा परिवार श्री दत्तात्रय महाराजांचे भक्त असून दत्तात्रय महाराजांच्या कृपा आशीर्वादाने हे महान कार्य आपल्या हातून घडत आहे असे उद्गार त्यांनी काढले.

या मंदिर भूमिपूजनास मा. आ. नमितताताई मुंदडा यांची प्रामुख्याने उपस्थित असून.

या कार्यक्रमास महादेव महाराज चाकरवाडीकर, प्रमोद काका कुलकर्णी, श्रीहरी महाराज पवार, रतन महाराज सासुरेकर, दिलीप साठे महाराज, स्वामीप्रनाथ, श्रीराम महाराज, गोपीनाथ महाराज शास्त्री, लक्ष्मण महाराज मेंडके, केशव महाराज शास्त्री घुले, विष्णु महाराज, ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज आंधळे, यांच्यासह अनेक संत, मान्यवर, उपस्थिती व आशीर्वाद राहणार आहे.

तरी सदरील कार्यक्रमास जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान गोकुळ उगले व परिवार सासुरा यांनी केले आहे.



# राष्ट्रसंत सेनाजी महाराजांची ७२५ वी जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**



दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सिंदखेड राजा येथे राष्ट्रीय नाभिक संघटनेच्या वतीने राष्ट्रसंत सेनाजी महाराजांची ७२५ वी जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सेनाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमात सेनाजी महाराजांच्या विचारांचा जागर करण्यात आला. शीख धर्माच्या पवित्र गुरु ग्रंथ साहिब या ग्रंथामध्ये सेनाजी महाराजांच्या अभंगांचा समावेश असल्याचे नमूद करत त्यांच्या महान कार्याची आठवण करून देण्यात आली.

सेनाजी महाराज हे परिवर्तनवादी, विज्ञाननिष्ठ विचारांचे पुरस्कर्ते तसेच वारकरी संप्रदायातील महान संत होते. त्यांच्या जीवनातून स्वाभिमान, भीमानी विचारसरणी व सर्जनशीलतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला. समाजात जागृती घडवून आणण्यासाठी ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करत घराघरांत ग्रंथालय उभारण्याचे आवाहनही करण्यात आले.

या कार्यक्रमास बहुसंख्य समाजबांधवांसह इतर समाजातील नागरिकांनीही उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवली.कार्यक्रमाला जिल्हा उपाध्यक्ष हरिदास जाधव, जिल्हा मुख्य सचिव डॉ. प्रकाश सवडतकर, तालुकाध्यक्ष विलास चित्रे, शहराध्यक्ष प्रदीप जाधव, गजानन राऊत, राम राऊत, विष्णू वैद्य, रामेश्वर जाधव, आकाश बोबडे, शिवानंद वैद्य, विजय बोबडे तसेच ॲड. हाडे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय नाभिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले असून कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# सम्राट अशोक नगर येथे भीमजयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील सम्राट अशोक नगर येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. परिसरात निळ्या पताकांनी सजावट करण्यात आली होती, तसेच सर्वत्र आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते.

दि. १४ रोजी सकाळी १० वाजता विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. ध्वजारोहणानंतर यशोधरा महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बुद्ध वंदना घेण्यात आली.

उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपब्लिकन सेनेचे युवा नेते विजय दादा साळवे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते जयसिंह भैय्या सोळंके, विरेंद्र दादा सोळंके, माजी नगराध्यक्ष तथा रिपाई तालुकाध्यक्ष अविनाश तात्या जावळे, माजी सभापती गयाबाई एकनाथ आव्हाड ( जीजी ) नगरसेवक दिपक मेंडके, कल्याण आबुज , पी.आर.पी. तालुकाध्यक्ष राकेश दादा साळवे, वंचितचे युवा नेते भारत तांगडे यांच्यासह बाबासाहेब भोजने, अशोक कांबळे, ड. नंदकिशोर खळगे, पत्रकार रवींद्र राऊत, अमर साळवे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण, समानता, बंधुता आणि सामाजिक न्याय या तत्त्वांचा अंगीकार करून समाजाने प्रगती साधावी, असे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमाला युवक-युवतींचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मोठ्या उत्साहाने या सोहळ्यात सहभाग नोंदवला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व
सिद्धार्थ ससाणे, शत्रुघ्न कसबे, प्रशांत जाधव, नितीन जावळे, ड प्रविन सोनवणे, अनिल भराटे, अजय साळवे, सिद्धार्थ खिल्लारे, आबा उजगरे, अनिल मोरे, आनंद शिंदे, रोहीत साळवे, विशाल मराठे, सचिन जावळे,
सोनु मगरे , धम्मा देशमाने, राहूल भद्रे, बुद्धीराज सिरसट केतन शिरसागर, संग्राम गायकवाड, आकाश भद्रे, वैराळे नाना, नितीन गायकवाड,
मिलींद वाव्हळकर, चंद्रगुप्त डोंगरदिवे आदिंनी परिश्रम घेतले. तसेच सम्राट अशोक नगर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# गंगामसला येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त समिती स्थापन; विविध कार्यक्रमांचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही गंगामसला येते विश्वभूषण महामानव बोधिसत्व विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून त्यासाठी बहुजन विकास मोर्चाचे जेष्ठ नेते विठ्ठल दादा पंडित यांच्या अध्यक्षतेखाली जयंती उत्सव समितीची निवड करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी हनुमान जी मेंडके, यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी पंकज पंडित, सचिव पदी, अमर साळवे सहसचिव पदी , विश्वजित गवळी, कोषअध्यक्ष पदी, कुणाल पंडित, सदस्य म्हणून, विशाल साळवे, शरद पंडित, प्रकाश साळवे यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीस ग्रा. प. सदस्य पंकज पंडित यांच्यासह सत्यभान गवळी, मुंजाजी गवळी,सिद्धार्थ हिरवे, मुरलीधर खोपे, अनंत साळवे, बंडू पंडित, बन्सी पंडित, रमेश गवळी, सुनील पंडित, अर्जुन पंडित सोनाजी गवळी, गौतम साळवे, रमेश पंडित, तुळजीराम पंडित, विजय साळवे, नारायण पौळ





आदींसह गावातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थितीत होते, जयंतीनिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये रक्तदान शिबिर ,रांगोळी स्पर्धा ,भाषण स्पर्धा ,तसेच भीम गीतांचा आर्केस्ट्रा यांचा समावेश आहे तसेच दिनांक २८ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता फटाक्यांची आतिषबाजी, ढोल ताशांच्या गजरात फुलांची उधळण करत भव्य मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.

# महिला आरक्षणासाठी मुख्यमंत्र्यांचे 'मिशन एकमत'

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

महिला आरक्षण विधेयकाच्या एकमताने मंजुरीसाठी केंद्र सरकारने कंबर कसली असतानाच, महाराष्ट्रातही या विषयावर राजकीय सहमती घडवून आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. संसदेच्या १६ ते १८ एप्रिल दरम्यान होणाऱ्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण सुधारणा विधेयक मांडले जाणार आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील लोकसभा आणि राज्यसभेच्या सर्व खासदारांसह विविध राजकीय पक्षांच्या प्रदेशाध्यक्षांना मुख्यमंत्र्यांनी पत्र लिहून या ऐतिहासिक विधेयकाला एकमताने पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाठवलेल्या पत्रांमध्ये प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह राज्यातील सर्व प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी हे पाऊल उचलले जात असून, या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे आणि विधेयकाला एकमताने पाठिंबा द्यावा, असे आवाहन या पत्रातून करण्यात आले आहे.

लोकसभेत दिसणार २८० महिला खासदार : केंद्र सरकारने 'नारी शक्ती वंदन विधेयक' सप्टेंबर २०२३ मध्येच मंजूर केले होते, मात्र त्याची अंमलबजावणी जनगणनेनंतर होणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेवर अवलंबून होती. आता सरकारने या प्रक्रियेला गती देण्यासाठी सुधारित विधेयक आणले असून, २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. नवीन विधेयकातील तरतुदीनुसार, लोकसभेच्या एकूण जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरून वाढवून ८५० केली जाणार आहे. ८५० पैकी ८१५ जागा राज्यांसाठी, तर ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी राखीव असतील. या ८५० जागांपैकी सुमारे २७३ ते २८० जागा महिलांसाठी आरक्षित राहतील.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077